# अक्षर वाङ्मय

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२१
वर्ष : बारावे अंक : दुसरा



संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

वर्ष : बारावे    अंक : दुसरा

ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२१

संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

कार्यकारी संपादक
डॉ. शिवाजीराव देशमुख

मार्गदर्शक
डॉ. अरुण प्रभुणे

संपादक मंडळ

डॉ. बाळासाहेब लबडे    डॉ. दीपक चिद्दरवार
डॉ. रत्नाकर बेडगे    डॉ. संदीप सांगळे

समन्वयक
रमेश देशपांडे, अमेरिका

समन्वयक
सोनाली जांभेकर, अमेरिका

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.

मुद्रक : प्रिंटसेल्फ, १५४३ 'ओंकार कॉर्नर', नवी पेठ, पुणे–४११ ०३०

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/–    **द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/–
**पंचवार्षिक वर्गणी :** रु.२०००/–    **अंकाचे मूल्य :** रु. १२५/–

* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रम


- संपादकीय ---------------------------------- ५
- मुखपृष्ठाविषयी ---------------------------------- ७
- 'संगीत जयद्रथ विडंबन'- एक आकलन ----------------- ३३
  **प्रा. चिन्मय मधू घैसास**
- भारतीय साहित्य संशोधनाच्या नव्या दिशा ----------------- ४१
  **डॉ. संजय कोळी**
- मराठी-कन्नड साहित्य संबंध ---------------------- ४६
  **डॉ. चंद्रकांत वाघमारे**
- आदिवासी साहित्य, संस्कृती आणि कला ---------------- ५१
  **डॉ. एस. डी. लांडे**
- कवी काळसेकर ------------------------------ ५५
  **प्रा. इंद्रजित भालेराव**
- लेखकाचे घर- नरहर कुरुंदकर ---------------------- ६६
  **डॉ. ऊर्मिला चाकूरकर**
- आठवणीतले बाबा -------------------------- ७५
  **तेजस्विनी देव**
- 'आठवणी' नरहर कुरुंदकर ---------------------- ९२
  **डॉ. बाळकृष्ण कवठेकर**
- जावे त्यांच्या वंशा -------------------------- १०३
  **सावित्री जगदाळे**
- 'आस्तिक' : मिथककथा आणि गांधीवादी विचारांचे प्रतिबिंब --- १११
  **डॉ. दिनेश वाघुंबरे**

- संकल्पाची सिद्धी : 'वादळवाटा' ------------------ १२३
  **डॉ. विद्यासागर पाटंगणकर**
- मराठी साहित्यातील समाजवास्तवाचे आशयाशी असणारे अनुबंध - १२७
  **डॉ. नानासाहेब पवार**
- 'पुढल्या हाका' : एक मानसशास्त्रीय दृष्टिकोन ------------ १३६
  **डॉ. प्रकाश शेवाळे**
- 'स्त्री जाणीवा आणि स्त्री संवेदना' : एक अभ्यास-
  नवा आश्वासक समीक्षा ग्रंथ ---------------------- १४१
  **प्रा. अरुण ठोके**
- कविता ------------------------------- १४५
  **विलास वैद्य, सुनीता धारवाडकर, डी. बी. जगत्पुरिया**
- 'अक्षर वाङ्मय' चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ------ १५०
- संपादक मंडळ ------------------------- १५२



**'अक्षर वाङ्मय' ची वर्गणी मनीऑर्डर / धनादेश / धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावयाची असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.**

**खाते: संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८६६९५६**

**IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील**

**अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८६६९५६**

**वार्षिक वर्गणी रु. ५००/-**

**द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/-**

**पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/-**

**गुगल पे नं.- ९४२३६५५८६१**

# 'स्त्री जाणिवा आणि स्त्री संवेदना : एक अभ्यास' : नवा आश्वासक समीक्षा ग्रंथ

– डॉ. अरुण ठोके

'स्त्री जाणिवा आणि स्त्री संवेदना एक अभ्यास' (निवडक कवयित्रींच्या आधारे) या समीक्षात्मक ग्रंथाचे नुकतेच प्रकाशन झालेले आहे. प्रस्तुत ग्रंथात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रांतांतील समकालीन स्त्री कवयित्रींच्या निवडक पंधरा कवितांचा आशय व अभिव्यक्ती या दोन अंगांनी स्त्री जाणीवा व स्त्री संवेदनासंदर्भात विचार करण्यात आलेला आहे. स्त्री जाणीवा समृद्ध करणाऱ्या आशयसूत्राचा शोध घेणे यासाठी समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय व आदिबंधात्मक समीक्षा पद्धतींचा अवलंब करण्याचा प्रयत्न रचना यांनी केलेला आहे.

आपल्या समाजात स्त्रीला दुय्यम मानण्याच्या धारणेमुळे रूढ झालेल्या परंपरांनी स्त्रियांच्या अभिव्यक्तीला फारसा वाव नव्हता. किंबहुना संत कवितेच्या परंपरेतही पुरुषांच्या तुलनेने स्त्री कवयित्रींची संख्या फार कमी होती. ज्या संत कवयित्रींनी कविता लिहिल्या त्यांना फार सोसावे लागले. संत कवयित्री जनाबाई, कान्होपात्रा व संत बहिणाबाई यांची उदाहरणे सांगता येतील. तरीही तत्कालीन समाजाला पुरोगामी दृष्टिकोन बहाल करण्याचे काम या कवयित्रींनी केले.

आधुनिक काळात मराठी कवितेत क्रांती झाली. केशवसुत ते मर्ढेकरी कविता, मर्ढेकरी कविता ते साठोत्तरी कविता ही मराठी कवितेची वेधक वळणे आहेत. या वळणांवरही बोटावर मोजण्याइतक्याच स्त्री कवयित्रींची कविता पुढे आली. स्त्रीवादी चळवळीच्या प्रभावातून स्त्रिया स्त्री जाणिवेच्या स्वतंत्र कविता लिहू लागल्या. ऐंशीच्या दशकात कवयित्रींच्या संख्येत बरीच वाढ झाली. नव्वदोत्तर काळात स्त्री जाणिवांचे प्रकटीकरण करणाऱ्या कवयित्रींची संख्या लक्षणीय आहे. आपल्याच काळात लिहिणाऱ्या नवोदित कवयित्रींच्या कवितांची दखल घेऊनन त्यावर साधक बाधक चिंतन करण्यातून प्रस्तुत ग्रंथांची निर्मिती झालेली आहे.

डॉ. भाग्यश्री यशवंत यांच्या कवितांचे नेटके विवेचन करून रचना यांनी ठळक विशेष नोंदवले आहेत. सन १९९० नंतर वैद्यकीय उपचारांच्या क्षेत्रात नवीन शोध लागले. हे नवीन शोधच स्त्रीभ्रूण हत्येस कारणीभूत ठरले. त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडले. एकीकडे मुलगी जन्माला येऊ नये असे वाटणे व पुढे त्याच मुलीच्या पोटी वंशवेल वाढण्याची अपेक्षा करणे या दुटप्पी सामाजिक भूमिकेचा पर्दाफाश डॉ. भाग्यश्री यशवंत यांनी केलेला आहे. हे वास्तव रचना यांनी उलगडून सांगितले आहे. तसेच भाग्यश्रींच्या कवितांतून तारुण्यात सुखी संसाराची स्वप्ने रंगविणाऱ्या मुलीच्या विवाहानंतर झालेल्या अपेक्षाभंगाची दुखरी जाणीव सूचकतेने व्यक्त झालेली आहे. स्त्रीच्या वाट्याला आलेले अनेक भोग, तिच्या घालमेलीचे अनुभव, त्यातच तिचे तुटत जाणे तरीही संसाराशी एकात्म होत त्यातच आपल्या जीवनाचे सार्थक शोधण्याचा केविलवाणा प्रयत्न करणे, चाळीशीनंतरच्या शारीरिक-मानसिक बदलांमुळे होणारी घालमेल, सासू-सुनेचा संघर्ष व शेवटी सहन करणं ही बाईची प्रकृती आहे. तिच्या सहन करण्यात फक्त बाईपण हेच मूळ आहे. या विचारसूत्राच्या आधारे त्यांच्या कवितांचे विश्लेषण नेमकेपणाने केलेले आहे.

श्रावणी बोलगेच्या कवितांत आत्मभान असून स्त्री-पुरुष विषमतापूर्ण समाजव्यवस्थेतील अनेक दोषांचे सोदाहरण प्रतीकात्मक चित्रण येत असल्याची मांडणी रचना यांनी केलेली आहे. पुरुषप्रधान संस्कृतीतील दुटप्पीपणा स्त्रियांच्या शोषणाला कारणीभूत ठरत असल्याची तीन जाणीव पोखरांच्या कवितांतून व्यक्त होते. बलात्कारित स्त्रीचे दुःख व तृतीयपंथीयांच्या वेदनांशी तादात्मिकरण करून घेतल्याने त्यांच्याविषयीच्या तरल संवेदना व्यक्त करणारी अभिव्यक्ती वेधक आहे. श्रावणी बोलगे यांनी अलक्षित विषय हाताळल्याने त्यांच्या कवितेतील आशयाचे नावीन्य चटकन लक्षात येते, असे निरीक्षण रचना यांनी नोंदवले आहे. बोलगेंच्या कवितांतून स्त्रियांच्या व्यथांचे व्यापक चित्रण करण्यात आले असल्याचा निष्कर्ष काढलेला आहे. उत्तर आधुनिक जीवनव्यवहाराचे संदर्भ बोलगेंच्या कवितांना आहेत असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. या अनुषंगाने सोदाहरण विश्लेषण करता आले असते.

श्रीमती स्वाती पाटील यांच्या कवितांतून स्त्रीच्या सोशिक वृत्तीचे अनेक दाखले भालेले आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने ग्रामीण जीवनावर केलेल्या विदारक परिणामांचे चित्रण करण्यात आलेले आहे. स्त्रियांतील सकारात्मक

वृत्तीच त्यांचे आत्मबल वाढीस कारणीभूत ठरत असल्याचा नवा काव्याशय स्वाती पाटील यांनी घडविला आहे. उदाहरणार्थ,

'नवरा मेला सोडून गेला तरी
नसतंच कोणालाही सुतक
तिच्या एकटेपणाचं...
त्याच्या टायमाला
कावकावणारे कावळे
तिच्या वेळी मात्र
कुठं गायब होतात
कोण जाणे?
संस्कृती जतन का काय म्हणतात
ते हेच असेल का कदाचित??
तिच्या जीतात्म्याचा काकस्पर्श रोखणार...।'

ताराबाई शिंदेंच्या लेखनशैलीची आठवण करून देणारी ही कविता प्रश्नार्थक शैलीत अवतरते तेव्हा आपल्या समाजातील विसंगतींवर नेमकेपणाने बोट ठेवते. स्त्रियांची कविता कशी असावी याची दिशा प्रस्तुत लेखनशैलीतून ध्वनित होते. या दृष्टीने स्वाती पाटील यांची कविता महत्त्वाची असल्याचे मत रचना यांनी नोंदविले आहे.

सावित्री जगदाळे या ज्येष्ठ कवयित्री आहेत. त्यांनी 'विठ्ठल' व 'कविता' ही दोन मिथके मांडून स्वतंत्र काव्याभिव्यक्तीची चुणूक दाखवून दिलेली आहे. मराठी कवितेच्या परंपरेशी अनुबंध साधणारी अभिव्यक्ती असल्याने त्यांच्या कवितेतील वैचारिकता संघर्षाऐवजी समन्वयाची भूमिका वठवते. त्यांनी योजलेल्या 'विठ्ठल' या मिथकाची सविस्तर चिकित्सा करणे उद्‌बोधक ठरेल. रचना यांनी त्यांच्या कवितांचे आकलन स्त्री जाणीव व संवेदना या केंद्रवर्ती सूत्र अभ्यासाच्या आधारे केलेले आहे. आत्मनिष्ठेकडून आत्मशोधाकडे वाटचाल करणारी स्त्री प्रतिमा आत्मोद्धाराच्या दिशेने विचार करू लागते, ही खास भारतीय स्त्री संवेदना सावित्री जगदाळेंच्या कवितांतून प्रत्ययाला येते. त्यांनी जीवनाचे तत्त्वज्ञान व्यावहारिक अनुभूतींतून तपासात संत कवितेशी नाळ जुळवून घेतल्याने अधिक प्रगल्भ स्त्री जाणीवा व संवेदनानुभूतींचे आविष्करण केलेले आहे.

उषा हिंगोणेकरांच्या कवितेचा प्रेरणास्रोतही आंबेडकरी विचारधारा आहे.

बंडखोर अभिव्यक्ती व शोषणाविरुद्ध आवाज उठविणे ही त्यांच्या कवितेची खास वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या कवितेतील विद्रोहाची भाषा क्रांतीचे आवाहन करते. क्रांतीच्या फँटसीत रममाण होण्याच्या सोस ही दलित कवितेची मर्यादा ठरण्याचा धोका संभवतो. कारण शांतीसाठी आवश्यक असणाऱ्या चळवळीचे थंडावणे, त्यातील स्वार्थी राजकारणामुळे कार्यकर्त्यांच्या उत्साहाला असलेली कुंठितावस्था व पैसाकेंद्री जीवनाचे आकर्षण क्रांतीला मारक ठरणारे आहे. अशा कविता दलित वास्तवापासून दूर जातात आणि काव्याभिव्यक्तीच्या दृष्टीनेही एकसुरी बनतात. ही बाब लक्षात घेऊन हिंगोणेकरांनी लेखन केले तर त्या प्रभावी काव्यनिर्मिती करतील. प्रस्तुत प्रकरणात अशी चिकित्सा अपेक्षित होती.

योगिनी सातारकर पांडे यांच्या कवितांतून प्रगल्भ स्त्री जाणीव व संवेदनांचा प्रत्यय येतो. समकालीन वास्तवाचे आकलन करून घेण्यासाठी मिथकांची योजना करून स्त्री पुरुष नात्याचा प्रभावी अर्थ उलगडण्याचा प्रयत्न म्हणून त्यांच्या काव्यसंहितांचे ठळक वैशिष्ट्य नोंदविता येते. उदा. द्रौपदी व कृष्ण या मिथकांची मैत्रभावाचे प्रतीक म्हणून योजना करण्यात आलेली आहे.त्यांच्या कवितांतील कमालीची सूचकता लक्षवेधक ठरते.

स्त्रीबरोबर तिच्या वेदनांनाही गृहीत धरणे अन्यायकारक आहे ही जाणीव उपहासाने करून देण्यात आलेली आहे. कवितेतील संवादात्मक शैली काव्यगत अर्थाला अधिक उठाव प्राप्त करून देते. पुरुषसत्ताक राजकारणातील कावेबाज डावपेच स्त्री शोषणाच्या मुळाशी आहेत, हे भान प्रकट होते. संस्कृती अभ्यासाचे पुनर्वाचन करून स्त्रियांच्या ऐतिहासिक योगदानाची पुनर्मांडणी करण्याचा विचार मौलिक आहे. त्यांनी चित्रित केलेली द्रौपदीची प्रतिमा मुळातून वाचण्यासारखी आहे. ही काव्यअभिव्यक्ती समकालीन स्त्री कवितांत मौलिक भर घालणारी आहे.

**डॉ. अरुण ठोके,** मराठी विभाग प्रमुख
के. के. वाघ कला, वाणिज्य विज्ञान आणि
संगणक विज्ञान महाविद्यालय, चांदोरी
ता. निफाड, जि. नाशिक
भ्रमणध्वनी-९९७५१६४७९९

❑❑❑